I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

# प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** नागपुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** सदर **Year (वर्ष):** 2024

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0758 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/11/2024 21:33 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 29/11/2024 **Date To (दिनांक पर्यंत):** 29/11/2024

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:55 तास **Time To (वेळेपर्यंत):** 13:06 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 29/11/2024 **Time (वेळ):** 19:15 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 042 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 29/11/2024 20:38 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तहसील कार्यालय, नागपूर, चे ईमारती समोरील  परिसर,, नागपूर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री संदेष प्रभाकर स्वामी

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं ए-3, ताजनगर, , तुकडोजी पुतळयाजवळ नागपूर, अजनी , नागपुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट नं ए-3, ताजनगर, , तुकडोजी पुतळयाजवळ नागपूर, अजनी , नागपुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7276635473

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. वैभव महादेव तायडे | | | 1. Town/Village (शहर / गाव): श्री मनोहर भोजने यांचे घरी,Tehsil (तहसील): किरायाने झिंगाबाई टाकळी,Police Station (पोलीस ठाणे): मानकापूर,District (जिल्हा): नागपुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | फिर्यादीचे जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख कार्यलय नागपुर येथुन कामाचे जप्त कागदपत्र | .00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ दराच्या 08 चलनी नोटा | 4,000.00 |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | ग्रे रंगाचा फॅर्मर फुल पॅन्ट | .00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | सॅनडीक्स कंपनीचे मेमरी कार्ड 32GB / 2नग | .00 |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 4,000.00

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद-- मी संदेष प्रभाकर स्वामी वय 31 वर्षे, व्यवसाय- बिल्डींग मटेरीअयल सप्लायर रा. प्लॉट नं. ए-3, ताजनगर, तुकडोजी पुतळयाजवळ नागपूर.

मी वर दिलेल्या पत्यावर परिवारासह राहत असुन दि. 28/11/2024 रोजी पोलीस उपअधीक्षक अनिल जिट्टावार ,ला.प्र.विभाग, नागपूर यांचे समक्ष लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने मी माझे स्वहस्तांक्षरात मराठी भाषेत लेखी तक्रार नोंदविली. पोलीस उपअधीक्षक, अनिल जिट्टावार, ला.प्र.वि.,नागपूर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर मराठीत टंकलिखीत करून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

माझे नावः-श्री. संदेष प्रभाकर स्वामी वय 31 वर्षे, व्यवसाय- बिल्डींग मटेरीअयल सप्लायर रा. प्लॉट नं. ए-3, ताजनगर, तुकडोजी पुतळयाजवळ नागपूर मो.क्र. 7276635473

मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, झिरो माईल नागपूर कार्यालयात हजर येऊन तक्रार देतो की, मी वर नमूद पत्यावर वास्तव्यास असून, मी बिल्डींग मटेरीयल सप्लायरचे काम करतो. माझे तसेच माझा भाउ विष्वास स्वामी व आई श्रीमती सविता स्वामी असे आमचे तिघांचे नावावर मौजा आडका, तह. कामठी येथे 5 एकर जमीन असुन त्या जमीनीचा भुमापन क्रं. 46/2, असा आहे. सदर शेताची मोजणी फेब्रुवारी 2024 मध्ये भुमीअभिलेख कार्यालय कामठी येथुन केली होती परंतु माझे मौजा आडका भुमापन क्रं. 46/2 ची मोजणी चुकीच्या पध्दतीने झाल्याने नकाषा मध्ये माझे जमीनचा भाग हा बाजुचे भुमापन क्रं. 48 मध्ये दाखविण्यात आला होता. त्यामुळे मी अंदाजे दोन महीन्यापुर्वी जिल्हा भुमीअभिलेख कार्यालय नागपूर येथे नकाषा दुरूस्तीचे करण्या सबंधाने गेलो असता मला तेथे भुमीअभिलेख कार्यालयातील भुकरमापक वैभव तायडे हे भेटले तेव्हा त्यांना मी मला नकाषा दुरूस्ती करावयाचे असल्याचे सांगीतले असता श्री. वैभव तायडे यांनी मला नकाषा दरूस्ती करणेकरीता बंदोबस्त नकाषा, बंदोबस्त सातबारा, अधिकार अभिलेख, क प्रत, सात बारा असे कागदपत्रे घेवुन येण्यास सांगीतले. त्यानंतर मी सदर कागदपत्रे गोळा केली.त्यानंतर मी दिनांक 27/11/2024 रोजी मी माझे मालकीचे मौजा आडका भुमापन क्रं. 46/2 चे नकाषा मधील दुरूस्ती करणे चा लेखी अर्ज व गैरअर्जदार वैभव तायडे, भुकरमापक जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय नागपूर यांनी सांगीतलेले कागदपत्रे घेवुन जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख नागपूर, येथे गेलो. तेथे मी नकाषा दुरूस्ती करण्याचा लेखी अर्ज व त्यासोबत नकाषा दुरूस्ती करीता लागणारे कागदपत्रे जोडुन सदर अर्ज कार्यालयात बसुन असलेले श्री. वैभव तायडे, भुकरमापक यांना भेटला श्री वैभव तायडे यांनी माझे कागदपत्रे बघितले व मला म्हटले की, “कागदपत्रे बरोबर आहे परंतु हे बघा इथे फाईलचा गठ्ठा लागुन आहे. तुमचे सुध्दा काम होण्यास उषीर लागेल, जर तुम्हाला तुमच्या जमीनीचे नकाषात दुरूस्ती लवकर करायची असेल तर मी 25 दिवसात तुमचे काम करून देवु शकतो परंतू त्याकरीता मला तुम्ही 5,000 रू दया. जर तुम्ही 5,000 रूपये दिले तर मी तुमचे काम लवकर

करून देतो.'' असे मला गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांनी म्हटले. तेव्हा मी त्यांना आता माझे जवळ पैसे नाही मी एक दोन दिवसात आणुन देतो असे म्हटले. तेव्हा श्री. वैभव तायडे यांनी मला माझा लेखी अर्ज आवक जावक विभागात देवुन रिसीव्ह घ्यायला सांगीतले.त्याप्रमाणे मी माझा नकाषा दुरूस्ती करण्याचा लेखी अर्ज व सोबत कागदपत्रे जोडुन आवक जावक विभागात देवुन रिसीव्ह का ॅफी घेवुन मी घरी परत आलो.परंतु माझे मौजा आडका, भुमापन क्रं. 46/2 चे नकाषा दुरूस्तीचे काम लवकर करून देण्याकरीता मला गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांनी मागीतलेली लाचरक्कम 5,000 रूपये ही मला त्यांना देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी आज दिन ाक 28/11/2024 रोजी गैरअर्जदार श्री. वैभव तायडे याचे विरूध्द तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपूर येथे हजर आलो.तसेच गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांच्याशी माझे कुठलेही वैमनस्य नाही व कुठल्याही प्रकारचे आर्थीक देवाण घेवाणीचे संबंध नाही. मला गैरअर्जदार श्री. वैभव तायडे, भुकरमापक जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, नागपूर यांनी मला मागीतलेली लाच रक्कम 5,000/- रुपये त्यांना देणेकरीता माझे बचती मधील 5,000 रू रक्कम आपणाकडे हजर करीत आहे. तसेच मी नकाषा दुरूस्ती करणेकरीता सादर केलेला लेखी अर्जाची रिसीव्ह का ॅफी व त्यासोबत सादर केलेले कागदपत्राचे झेरा ॅक्स प्रत हजर करीत आहे.

करीता गैरअर्जदार श्री. वैभव तायडे, भुकरमापक, जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, नागपूर यांच्याविरुध्द कायदेषिर कार्यवाही होण्याकरीता मी मराठी भाषेत स्वहस्ताक्षरात लेखी रिपोर्ट देत आहे.

त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री अनिल जिट्टावार,ला.प्र.वि.,नागपूर यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून मला त्यांची ओळख करून दिली. त्यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझा स्वहस्ताक्षरातील व टंकलिखीत तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री अनिल जिट्टावार,ला.प्र.वि., नागपूर यांचे सुचनेवरून माझ्या स्वहस्ताक्षरातील व टंकलिखीत तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी सही केली व मी टंकलिखीत तक्रार अर्जावर स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस उपअधीक्षक, श्री अनिल जिट्टावार,ला.प्र.वि.,नागपूर यांनी माझे टंकलिखीत तक्रार अर्जावर स्वाक्षरी केली. तसेच मी सादर केलेल्या माझे शेतीच्या नकाश्याचे दुरूस्ती करीता दिलेला अर्ज व त्यासोबतचे कागदपत्रांवर मी माझी स्वाक्षरी केली तसेच दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली तसेच श्री. अनिल जिट्टावार पोलीस उपअधीक्षक लाप्रवि.नागपूर यांनी समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री अनिल जिट्टावार, ला.प्र.वि.,नागपूर यांनी माझ्ोकडे गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांना देण्यात येण्याकरीता, लाचेकरिता वापरण्यात येणारी रक्कम जमा करण्यास सांगितले. त्यावरून मी स्वबचतीचे रुपये 5000 (ज्यात रू. 500/- दराच्या 10 चलनी नोटा) लाचरक्कम देणेकरीता पोलीस उपअधीक्षक श्री अनिल जिट्टावार, ला.प्र.वि.,नागपूर यांचेकडे कार्यालयात जमा केली. कार्यालयात दिनांक 28/11/2024 रोजी माझे व दोन्ही पंचासमक्ष सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात आले व कार्यवाही संबंधाने प्रात्यक्षीक करून दाखवुन सदरच्या नोटा एका लिफाप्यात ठेवुन करावयाच्या कारवाईचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच व्हाईस रेकॉर्डर कश्या प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली. त्याबाबत प्रात्यक्षीक पंचनामा मध्ये नमुद केले आहे. गैरअर्जदाराच्या कार्यालयाची वेळ संपल्याने मी केलेल्या विनंती वरून श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक व दोन्ही पंच, सापळा पथकाचे संमतीने सापळा पडताळणी कार्यवाही दिनांक

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

29/11/2024 रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय झिरो माईल सिव्हिल लाईन, नागपूर येथुन करण्याचे सर्वानुमते ठरवुन, मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकास दि. 29/11/2024 रोजी सकाळी 10.30 वा ला.प्र.वि. कार्यालय नागपुर येथे हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले.मी दि. 29/11/2024 रोजी लाप्रवि झिरो माईल कार्यालय, नागपूर येथे सकाळी 11.30 वा हजर आलो. दि. 29/11/2024 रोजी श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, दोन्ही पंच तसेच सापळा पथकाचे संमतीने सापळा पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पो.उपअधीक्षक श्री अनिल जिट्टावार यांनी पंचासमक्ष लोकसेवक यांची लाच रकमेची मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगून सापळा कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. माझी सापळा पथकातील सदस्यांनी पंचासमक्ष पडताळणी पुर्वीची अंगझडती घेवुन श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक यांचे सुचनेवरून सापळा पथकातील सदस्य यांनी एक नविन मेमोरी कॉर्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकुन त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून रेकॉर्डरमध्ये पंच क्र. 1 श्री. अजय येवले यांचा आवाज रेकॉर्ड करुन व्हाईस रेकॉर्डर सुरू स्थितीत धाग्याच्या सहायाने माझे गळयात अडकवून पंच क्र. 1 श्री. अजय येवले यांचेसोबत मला श्री. वैभव तायडे, भूकरमापक, जिल्हा अधीक्षक भुअभिलेख कार्यालय नागपूर यांची लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता माझे दुचाकी वाहनाने पाठविण्यात आले. मी पंच क्र. 1 सह श्री. वैभव तायडे, भूकरमापक, जिल्हा अधीक्षक भुअभिलेख कार्यालय नागपूर हे तहसिल कार्यालय, नागपूर येथील वरील माळयावर असल्याने मी तहसिल कार्यालय नागपूर परिसरातुन मी माझे मोबाईल क्रमांक 7276635473 यावरून गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांचे मोबाईल 9657741302 वर कॉल केला असता त्यांनी कॉल उचलला नाही. त्यानंतर माझे मोबाईल क्रमांक 7276635473 वर गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांचे मोबाईल क्रमांक 9657741302 वरून कॉल आला व मोबाईलवर माझे श्री. वैभव तायडे यांचेशी बोलणी झाली. मी त्यांना कळविले की, मी कार्यालयाचे खालील परिसरात तहसील कार्यालयाच्या गेटजवळ आलो आहे. त्यांनी कॉल कट केला. त्यानंतर पुन्हा थोडयावेळानी माझे मोबाईल क्रमांक 7276635473 वर गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांचे मोबाईल क्रमांक 9657741302 वरून कॉल आला व मोबाईलवर माझे श्री. वैभव तायडे यांचेशी बोलणी झाली त्यावर त्यांनी मला कुठे आहे असे विचारल्यावरून मी त्यांना सांगितले की, मी कार्यालयाचे खालील परिसरात तहसील कार्यालयाच्या गेटजवळ निळा कोट घालुन उभा असल्याचे सांगितले. त्यानंतर ते मला दिसल्याने त्याना मी हात दाखवुन इकडे असल्याचे सांगितले तेव्हा त्यांची नजर माझेवर पडल्याने ते माझे जवळ आले. मी समोर जावुन परिसरातील पार्कींग जवळ थांबलो. गैरअर्जदार हे माझे तहसील कार्यालयाचे पार्कीगजवळ आले तेथे मी गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांचेशी माझा शेताच्या नकाशा दुरूस्ती कामाबाबत बोललो असता त्यांना मला मागितलेली लाच रक्कम 5000/-रू मी घरच्यांना सांगितले त्यांनी मला जास्त होत असल्याचे सांगितल्याने त्यात काही कमी करा असे बोललो असता गैरअर्जदार श्री. वैभव तायडे यांनी मला ठिक है ना देख लेंगे कितने लाया असे म्हटले असता मी त्यांना पैसे आणावे लागेल व किती दयावे लागेल असे विचारले असता गैरअर्जदार श्री.वैभव तायडे चार तो करो ठिक है लावो मै करता अँडजेस्ट असे म्हणुन, मला तडजोडीअंती माझे नकाशा दुरूस्ती करण्याचे काम लवकर करून देण्याकरिता 4000/-रू. लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली.(उर्वरीत मजकुर बसत नसल्याने मागील पानावर

घेण्यात येते आहे.)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Mansiha Kashid (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Mansiha Kashid

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1995 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**